<u>**अर्जदारांचे प्रश्न व शंका**</u>

## 1. ऑनलाइन फॉर्म कसे सादर करावे?

- ऑनलाइन अर्ज करताना अपलोड करणार असलेले दस्तऐवज स्कॅन करावा.
- स्कॅन केलेल्या प्रतिमा एका फोल्डरमध्ये जतन करा.
- नोंदणी करा व उपलब्ध लॉग इन करून ऑनलाइन फॉर्म भरणे सुरु करा.
- उपरोक्त फोल्डरमधून स्कॅन केलेले प्रतिमा योग्य त्या दिलेल्या पर्याया मध्ये अपलोड कराव्यात.
- ऑनलाइन अर्ज मधील संपूर्ण स्वरुपात सर्व तपशील भरावा.
- अर्ज शुल्क भरणा ऑनलाइन पेमेंट द्वारे करावा.
- देयक यशस्वी झाल्यानंतरच आपला फॉर्म सबमिट केला जाईल

## 2. फॉर्म प्रिंट कसा करावा?

<u>प्रवेश प्रक्रिया हि कागद विरहित असल्यामुळे संगणक प्रणाली मध्ये अर्ज छपाईची सुविधा देण्यात आलेली नाही.</u>

## 3. मी माझा पासवर्ड विसरलो/विसरले,कसा रीसेट करू?

- वेबसाइटला भेट द्या
- लॉगिन बटणांच्या शेजारीच असलेल्या "Forgot Password" बटण वर क्लिक केले असता एक संवाद बॉक्स उघडेल.
- आपला नोंदणीकृत मोबाईल क्रमांक प्रविष्ट करा.
- पासवर्ड मिळवा (Get Password) बटनावर क्लिक करा.
- आपल्याला एसएमएसद्वारे आपला पासवर्ड प्राप्त होईल.

## ४. अपूर्ण फॉर्म कसा सादर करावा?

- वेबसाइटला भेट द्या व लॉगिन करा.
- आपण तपशील भरण्यासाठी किंवा दस्तऐवज अपलोड करण्याच्या टॅबवर भेट देवून अपलोड करावे.
- सारांश (summary) टॅब ला भेट द्या आणि "अर्ज सबमिट करा" बटण वर क्लिक करा.
- पेमेंट यशस्वी झाले असल्यास फॉर्म सबमिट करणे शक्य आहे.

## अर्जदारांचे प्रश्न व शंका

### ५. माझा सबमिट केलेला अर्ज योग्यप्रकारे सबमिट झाला किंवा नाही हे कसे पाहावे?

- आपला वैध लॉगिन व पासवर्ड वापर करून साइटवर लॉग इन करा. आपल्याला फॉर्मची सद्य स्थिती दाखवली जाईल.

### ६. मी फॉर्म सबमिट केला आहे परंतु, मी कागदपत्र प्रतिमा अपलोड करण्यास विसरले आहे / मी दस्तऐवज प्रतिमा अपलोड करू शकत नाही कारण ते उपलब्ध नव्हते.

तक्रार निवारणाच्या कालखंडात आपण दस्तऐवज प्रतिमा / अपलोड करू शकतो.

### ७. माझ्या अर्जाचे ऑनलाईन पेमेंट होत नाही व माझा फॉर्म ऑनलाइन सबमीट पण होत नाही.

- ऑनलाइन देयकांत अनेक कारणांमुळे प्रतिसादात विलंब होत असतो. कृपया आपण प्रतीक्षा करा किंवा लॉग आउट आणि काही काळानंतर पुन्हा लॉगिन करून, ऑनलाइन सबमिट करून पहा. प्रतिसादात विलंब / प्रतीक्षा कालावधी हा 24-48 तासांपर्यंत असू शकतो. पेमेंट पूर्ण झाल्यावर फॉर्म सबमीट करता येईल.